महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, स्टेशन रोड, उस्मानपूरा, छत्रपती संभाजीनगर .
Email: chair.aurboard@mahedu.gov.in/lekha.abadboard@gmail.com
Tel: Div.Chairman(P.) : (0240)-2331116 EPABX -2334228/2334284 Fax : 2321201 Div. Secretary (P) :2341035

जा.क्र./छसंविमं/लेखा/2873
दिनांक:- २५ /०२/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
छत्रपती संभाजीनगर मंडळातर्गत दुष्काळ घोषित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालय,
छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, जालना, हिंगोली जिल्हे.

विषय- सन २०२३-२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.१० वी व इ. १२वी च्या विदयार्थ्याचे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरिता उर्वरित विदयार्थ्याचे बॅक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दि.१८ फेब्रुवारी ते दि.२८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत उपलब्ध असल्याबाबत....

संदर्भ- क्र.रा.मं/सन २०२३ दुष्काळ खहं/७०५ दि.१८/०२/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ व शुध्दीपत्रक दि.०३/०२/२०२० अनुसार, सन २०२३-२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.१० वी व इ.१२वी च्या विदयार्थ्याचे/ पालकांच्या आधार सलंग्न बॅक खात्यात जमा करण्यात आले आहे.

परीक्षा शुल्काचा परतावा करण्याकरिता अपात्र झालेल्या विदयार्थ्याची यादी यापुर्वीच पाठविण्यात आलेली आहे. तरी आधार क्रमांक हे खातेदाराची जी बॅक आहे ती खाजगी बॅक अथवा सहकारी बॅक या बॅकेच्या वैयक्तिक नंबरशी जोडलेला नाही, खाते बंद केलेले आहे, खाते गोठवलेले आहे, अज्ञान खातेदाराचे सज्ञान झाल्यानंतर बॅकेमध्ये कागदपत्राची आवश्यक पूर्तता न करणे, उपलब्ध झालेली माहिती अवैध असल्याने, जसे आधार क्रमांक चूकीचा, अशामुळे परीक्षा शुल्क अदा न होण्याची कारणे बॅकेकडून प्राप्त झालेली आहे. तरी उपरोक्त माहितीमध्ये दुरुस्ती/सुधारित माहिती सादर करण्याकरिता ऑनलाईन पोर्टल दि.१८ फेब्रुवारी ते दि.२८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सुरु करण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ,
छत्रपती संभाजीनगर